# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९

ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**७४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४.११.२०२५**

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (०७/११/२०२५ ते १३/११/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१५/११/२०२५ ते १९/११/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| २९.६ | २९.८ | २९.६ | २९.४ | २८.६ | २८.४ | २९.० | कमाल तापमान (अंसे) | २९ | २९ | २८ | २८ | २९ |
| १७.१ | १६.३ | १६.१ | १४.३ | १२.७ | ११.३ | १०.७ | किमान तापमान (अंसे) | ११ | १० | १० | ९ | १० |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | १ | १ | १ |
| ७३ | ८१ | ७६ | ७२ | ७१ | ६८ | ६९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७० | ६७ | ६७ | ६७ | ६५ |
| ६४ | ६४ | ६४ | ६० | ६५ | ६३ | ५६ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | २४ | २५ | २४ | २३ |
| ०.३ | ०.३ | ०.३ | ०.४ | ०.४ | ०.३ | ०.४ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ५ | ७ | ७ | ७ | ८ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. **किमान तापमानात घट होण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) शेतकरी बंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतः ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. |
| संदेश | | बागायती गव्हाची पेरणी नोव्हेबरच्या दुसऱ्या आठवड्यानतर पेरणी करु नये. उशीरा पेरणी केल्यास उत्पादना घट येते. |
| तूर | शेंगा भरण्याची अवस्था | शक्य असल्यास शेंगामध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत पिकास पाणी द्यावे किंवा २ टक्के पोटाशियम नायट्रेटची (२०० ग्राम पोटाशियम नायट्रेट १० लिटर पाण्यात) फवारणी करावी. |
| गहू | पेरणी | बागायती गव्हाची पेरणी नोव्हेबरच्या दुसऱ्या आठवड्यानतर पेरणी करु नये. उशीरा पेरणी केल्यास उत्पादना घट येते. |
| हरभरा | पेरणी | पेरणीची वेळ लाबल्यास किवा डिसेबरनंतर पेरणी केल्यास उत्पन्न फार कमी मिळते.<br>हरभरा पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली व ३० दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. |
| करडई (कोरडवाहू) | वाढीची अवस्था | पहिली कोळपणी पेरणी नंतर ३ आठवड्यांनी फटीच्या कोळप्याच्या साहाय्याने करावी. तर दुसरी कोळपणी पेरणी नंतर ५ आठवड्यांनी पासेच्या कोळप्याच्या सहाय्याने करावी. |
| रब्बी मका | वाढीची अवस्था | पेरणी नंतर रब्बी मका पिकात पक्षी राखण, नांग्या भरणे/ विरळणी करणे तसेच तणनियंत्रण / भर देणे ई. महत्त्वाच्या आंतरमशागतीचे कामे करावीत. |
| रबी ज्वारी | उगवण | रबी ज्वारीमध्ये पहिली कोळपणी पेरणीनंतर तीन आठवड्यांनी फटीच्या कोळप्याने करावी. यामुळे तणांचे नियंत्रण व पिकाला मातीची भर दिली जाते. |
| बटाटा | पेरणी | रब्बी हंगामासाठी बटाटा या पिकांच्या लागवडीकरीता कुफरी ज्योती, कुफरी लवकर, कुफरी सिंधुरी, कुफरी सूर्या, कुफरी पुखराज ई.जातींचा वापर करावा. |
| वाटाणा | पेरणी | रब्बी हंगामासाठी वाटाणा या पिकांच्या लागवडीकरीता बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया ई. वाणांचा वापर करावा. |
| टोमॅटो | | भाजीपाला पिकांवर रस शोषणाऱ्या किडींचा व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.<br>टोमॅटोवर करपा व फळसड दिसून आल्यास जमिनीवर पडलेली रोगग्रस्त पाने, फळे गोळा करुन व्यवस्थित जाळून नष्ट करावीत. ती बांधावर अथवा प्लॉट शेजारी टाकू नये.<br>रोग नियंत्रणासाठी टेब्युकोनॅझोल १० मिली प्रति दहा लीटर पाण्यात मिसळून साध्या हात पंपाने फवारणी करावी. पुढील फवारणी गरजेनुसार १०-१५ दिवसाच्या अंतराने करावी. |
| लसूण | | लसूण पिकाची लागवड झाल्यापासून २० ते २५ दिवसांनी खुरपणी करून शेत तणमुक्त ठेवावे. |
| पशुधन | जनावरांची हिवाळयात घ्यावयाची | रात्रीच्या वेळी थंडी तर दिवसा कडक ऊन अशी विषम परिस्थिती तयार झाली आहे. हा ऋतू आरोग्यदायक असला तरी लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान / शेडनेटचे पडदे |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | **काळजी** | लावावेत. तसेच गोठ्यामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोट्या जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषत: गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टरपेंटाईनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट-पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अतिथंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळ्या-खुरकुज आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : १४.११.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**